REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018

# समाजातील अंधश्रध्देविरुध्दचा साधनेचा लढा

**Ravindra Prabhakar Pradhan**
**Ph.D. student SP Pune University Pune.**

साधनाने नेहमीच समाजातील जाणीवा जागवण्याचे कार्य केले. एवढेच नव्हे त्या सामाजिक परिवर्तनात या ना त्या प्रकारे सहभागी करण्यासाठी आवाहनही केले.घरातील एक स्त्री शिकली, तर ते घर सुधारते अशा प्रकारे समाजातील असंख्य घरे सुधारल्यामुळे समाज सुधारतो.घरात लहान मुलांवर स्त्रियाच संस्कार करतात.लहानपणी मूल हे आईच्या सान्निध्यात वाढते, म्हणून मुलांवर खरे संस्कार हे घरीच होतात. भारतातील स्त्री-समाजात अंधश्रध्दा अधिक प्रमाणात आढळते. याचे एक महत्वाचे कारण हे की, प्राचीन काळापासून स्त्री ही शिक्षणापासून वंचित होती. माणसे एखादया घटनेमागील कार्यकारण भाव न शोधताच ती घडण्यामागे दैवी शक्ती आहे असे समजतात व त्या घटनेवर विश्वास ठेवतात, त्यासच अंधश्रध्दा म्हणतात. कोणत्याही घटनांच्या संदर्भात माणसांच्या विचारांचा प्रवाह जेथे थांबतो, तेथपासून अंधश्रध्देला सुरुवात होते.आजही देवळात देवदर्शनासाठी जाणा-या बहुसंख्य स्त्रिया मनात हेतू ठेवूनच देवदर्शनास जातात. देवासाठी दरवर्षी बोकड कापलाच पाहिजे असाही नियम काही स्त्रियाच करतात,

हिंदूसंस्कृतीतील स्त्रीच्या स्थानाची चिकित्सा केल्यांस अत्यंत अन्याय झालेला दिसून येतो. विवाह झाल्यावर स्त्रीने पती हाच देव मानवा तो आंधळा, पांगळा, लैंगिक रोगाने पछाडलेला असला तरी स्त्रीने त्याची पतीचे सेवा करावी, त्याचा कधीही त्याग करु नये ही धर्माज्ञा होती.सौभाग्यवती स्त्रीला सर्व धार्मिक अधिकार तोवरच असतात जोवर तिचा पती जिवंत आहे. पतीच्या मृत्यूनंर मात्र तिचे सर्व अधिकार काढून घेतले जातात. तिचा सामाजिक, कौटुंबिक, धार्मिक दर्जाच बदलतो. मनुस्मृती म्हणते,‘पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीने शुभ्र अशी फुले, कंदमुळे आणि फळे खारुन शरीर सुकवून टाकणे चांगले पण तिने दुस-या पुरुषाचे नावही घेऊ नये.’[१] आणि विधुराने काय करावे ? तर ‘पत्नीचा मृत्यू झाल्यावर पतीने तिचे दाहकार्य वगैरे अत्यंसंस्कार करावेत आणि पुन्हा लग्न करावे.’

सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी होणाऱ्या विरोधाला अनेकवेळा धर्माचा आधार घेतला जातो. अस्पृश्यता व बाट लागण्याची अंधश्रध्दा यांच्या सनातनी तटबंदयाना देवाचा आधार असतो. पवित्र देवच मंदिराच्या रुपाने विषमतेचे एक दृश्य प्रतीक म्हणून कार्य करीत असतो. ईश्वराशी जोडलेल्या वर्णव्यवस्थेच्या हजारो वर्षाच्या शृंखलाही देव धर्माशी निगडीत असतात.



‘आम्हाला चालतं हो पण आमचा इथं देव आहे ना त्याला चालत नाही’ असे सांगून पुण्यातील उच्चवर्णीयांनी त्यांना त्यांच्या जातीची जाणीव मात्र सारखी करुन दिली म्हणून माधव कोंडविलकर साधनात लिहितात, ‘बाबासाहेबांनी महाडच्या चवदार तळयात पाणी मिळण्यासाठी बंडाची तुतारी फुंकली त्याला पन्नास वर्ष पूर्ण झाली. आणि उदया शंभर वर्ष पूर्ण होतील. पण आम्हाला चिकटलेली ही

जात कधीच जाणार नाही अशी माझी खात्री झालेली आहे. म्हणून हे बंडाचे निशाण अधिक उंच धरायला हवे.' [२]

माधव कोंडविलकरांच्या 'जेथे जातो तेथे माझा सांगाती' या लेखाच्या संदर्भामुळे सामाजिक परिवर्तन कसे कठीण आहे आणि अत्यंत चिकाटीने व संयमानेच समानतेचा मार्ग काढावा लागेल असे दिसते.

पोतराज म्हणजे देवीच्या नावाने व्यक्ती सोडायची आणि दारोदार भीक मागुन उपजिविका करायची. दलितातांतील महार आणि मांग समाजात प्रामुख्याने पोतराजांचे प्रमाण प्रामुख्याने जास्त दिसून येते. रुढी परंपरा कितीही वाईट असल्या तरी बहुतेक लोकांना त्या प्रिय वाटत असतात. त्या टिकवून ठेवण्याची धडपड या ना त्या मार्गाने लोक करीत असतात. साधनाच्या 'पोतराज : पोटार्थी की रुढी विरोधी?' या लेखात रामनाथ चव्हाणांनी पोटराज्याच्या पोटासाठी आर्थिक निधीचं आवाहन जेव्हा तरुण करतात तेव्हा टिका केली आहे. भारतीय मातंग संघटनेच्या तरुणांनी पोतराजा विरुध्द आंदोलन केले आहे, पोतराज प्रथा बंद करण्यासाठी जो संघर्ष सुरु केला आहे त्याबद्दल काही मुद्दे मांडले आहेत. ते म्हणतात, "पोतराजाचा उद्धार करण्यास निघालेली ही मातंग तरुण मंडळी पोतराजाला एक माणूस म्हणून स्वाभिमानाने उभा करणार आहेत की पोतराजाचे नुसते पोट भरावे म्हणून आर्थिक निधी गोळा करणार आहेत? हे पाहणं महत्वाचे ठरेल." [३]

रविवार दि. ५ जून १९८३ रोजी ठाणे जिल्हयातील वाडा तालुक्यातील आबिटघर गावी नऊ स्त्री पुरुषांना भुताटकी करण्याच्या आरोपावरुन तापत्या सळईने डागण्यात आले तर पार्वतीबाई वाघ या आदिवासी स्त्रीला तापलेल्या तव्यावर उभे करण्यात आले. आजही ग्रामीण भागात भुताटकी ठरवून स्त्रीयाचा जो अमानुष छळ करण्यात येतो त्याचे अंगावर काटा येणारे वर्णन 'अमानुष छळाचा न्याय' [४] या साधना अंकातील लेखात केलेले आहे. आणि त्यामागे केवळ धर्म-अंधश्रध्दा-वेडगळ समजूतीच फक्त नसून आर्थिक आहे. पार्वतीच्या नवऱ्याने मजूरी वाढवून मागितली त्याला काही आदिवासी यांनी पाठींबा दिला त्याची शिक्षा म्हणून त्याच्या 'स्त्रीला' ही भयंकर शिक्षा देण्यात आली. समाजात वावरत असताना अनेक वेळा युध्दात, दंग्यात, राजकारणात बदला घण्याकरता किंवा दुश्मनी काढण्याकरिता स्त्रींयाचा अमानुष छळ केल्याची उदाहरणे सापडतात त्यातीलच हे एक उदाहरण साधना ने वाचकांसमोर ठेवले.

साधनाने आपल्या अंकात सिंधू कंक या देवाला वाहीलेल्या परंतु नविन जीवन जगणाऱ्या मुलीची गोष्ट सांगीतली आहे. चार वर्षाची असताना सिंधू खूप आजारी होती. दवाखान्यासाठी पैसे नाहीत तेव्हा व्हरांडया आईला साकडे घातले की 'जगली तर तुही-मेली तर तुहीच' नंतर सिंधूला बरं वाटले. ती आता वीस वर्षाची. 'व्हरांडया आईच्या नावाने सोडलं, परत कशी घेऊ?'' [५] ही आईची भूमिकाच अंधश्रध्देचे चित्रण करते. मात्र समता आंदोलनाच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन सिंधूच्या आईची समजूत काढून, सिंधू कंकचे लग्न लावून देतात. अत्यंत साधेपणाने केलेल्या लग्नामुळे एक सिंधू वाचली.अन्यथा तीचं जीवन म्हणजे निव्वळ अंधार राहीला असता, धार्मिक परंपरेखाली तीला संपूर्ण आयुष्य गुलामीत घालावे लागले असते. एका सामाजिक प्रश्नाची समंजसपणे सोडवलेली ही कहाणी अंधश्रध्देच्या जोखडात अडकलेल्या मनाला एक नवी उभारी देते. देवदासींच्या मुरळींचा भविष्यात आशेचा एक किरण साधना या कथेव्दारे निर्माण करते.

साधनातील समता-संगर वर्धापन दिन विशेषांकात अठरा वर्षांच्या कल्पना शिवाजी खलारे या हिंदू मराठा जातीतल्या मुलीची देवदासी प्रथेविरुध्दच्या संघर्षाची कहाणी सांगितली आहे. फलटण शहरातील महानुभाव पंथातील संन्यास घेण्याच्या प्रथेला तिने विरोध केला. चार बहीणींपैकी तिघींना मठाने संन्यास दिला जेव्हा चौथी बहीण आशा ने जेव्हा संन्यासी होण्यास नकार दिला, तेव्हा प्रचंड दबाव, सामााजिक परंपरेचा प्रश्न निर्माण केला गेला. डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या मदतीने या पध्दतीविरुध्द कायदेशीर मदतीचा मार्ग अवलंबण्याचा प्रयत्न करुन पाहिला. फलटण या 'महानुभाव पंथाची काशी' समजल्या जाणाऱ्या शहरात 'महिला समता परिषद' भरवली गेली. धर्म परंपरावादयांनी महाराष्ट्रभर निषेध मोर्चे काढले. परंतू त्यातनही कल्पनेचं बंड अधिकच उठून दिसले परंतू आपले झाले ते झाले पुढच्यांच्या लेखी येणारी खुशीची बरबादी टाळावी यासाठी तिनं उभे राहायचे ठरवले. भारतातल्या महानुभाव पंथातली ही पहिली बंडखोरी, धर्माविरुध्द केलेली. अठरा वर्षाच्या एका कुमारिकेने सावित्रीबाई फुलेंनी पेरलेले अगदीच वाया गेले नाही याची खूण पटवून दिली! सामाजिक सुधारणा करताना येणाऱ्या या आश्वासक बदलांना आपल्या लेखातून[६] साधना मार्फत मांडणाऱ्या लेखाने अनेक अन्यायग्रस्त व्यक्तींना एक नवा आशावाद स्फूर्ती मिळाली.

'देवदासी प्रथा' वाईट आहे एवढेच सांगून साधना थांबली नाही तर त्या देवदासी प्रथेविरुध्द लढणाऱ्या देवदासींचे पुर्नवसन करणाऱ्या 'सावली' संस्थेला मदत करण्याचे आवाहनही 'देवदासींसाठी सावली' [७] या लेखात साधनाने केले. त्यामुळे ही

प्रथा वाईट आहे, देवदासींनी माणसांत आणून एक सन्मानाचे जीवन जगण्यासाठी आपणही मदत केली पाहिजे हि भावना व विचार साधना या मदतीच्या आवाहनामधून करताना दिसून येते.

विधवा स्त्रीला पतीच्या संपत्तीत वाटा मिळू नये, तिने तसा हक्क दाखवू नये, म्हणून तिला जबरदस्तीने सती जाण्यास प्रवृत्त केले जात असे.सतीची चाल पडण्याचे आणखी एक कारण म्हणजे पुरुषाला इहलोकी जिवंतपणी पत्नी, नोकर-चाकर, सुखोपभोगाच्या वस्तू इत्यादींची गरज भासते. तो मरण पावल्यावी परलोकीही त्याला या सर्वांची गरज असतेच, अशी प्राचीन काळच्या अनेक लोकांची श्रध्दा होती. या श्रध्देपोटी मृताच्या पत्नीला त्याच्या बरोबर जाळण्याची प्रथा सुरु झाली. जिवंत पतीच्या सुखाची काळजी हा धर्मग्रंथकारांनी वाहिलीच पण मृत पतीच्याही सुखाचा त्यांनी विचार केला. परंतु जिवंत स्त्रीच्या सुखाचा विचार मात्र त्यांना कधीही करावासा वाटला नाही.

ब्राम्हण वर्गातही पददलित वर्ग म्हणजे ब्राम्हण स्त्रीया.यांचा या समाजाने खुप छळ केला आहे.माधवरावांबरोबर रमाबाईसती गेली, याचा गौरव वाटतो.खरे तर शरम वाटावयाला पाहिजे.रमाबाई ब्राम्हण जातीत जन्माला आली म्हणून माधवरांवाबरोबर त्यांच्या २३व्या, २४ व्या वर्षी जिवंत जाळून घेते हा काय प्रकार आहे ? कदाचित रमाबाई मनापासून 'सती' गेली असेल असा मुद्दा मांडला जाईल. पण हा तर फार भयंकर विचार आहे. प्रथम सामाजिक परिस्थितीच अशी निर्माण करावयाची की, स्त्रीचे विचार तिकडेच वळले पाहिजेत... ब्राम्हण स्त्रीने नवऱ्याबरोबर सती जाणे हेच पुण्यकृत्य, असे जर ब्राम्हण भिक्षुवर्ग सारखे कानी कपाळी ओरडले . तर 'रमाबाई' सारखी सर्वसामान्य विचाराची स्त्री काय वेगळा मार्ग अनुसरणार ?[८] 'पडसाद' या साधना सदरातील पत्रातील गंभीर प्रश्न समाजाला विचार करण्यास प्रवृत्त करतात.

राजस्थानमधील देवराला या गावातील रुपकुंवर सती घटनेमुळे संपूर्ण देश हादरुन गेला. सामाजिक समतेच्या युगात अजूनही मध्ययुगीन मनोवृत्ती अस्तित्वात आहे आणि त्या मनोवृत्तीतील वेळीच पायबंद घालण्यात समाज, पोलिस व प्रशासन जेव्हा हतबलता व्यक्त करतात तेव्हा अशा प्रकारच्या घटना घडत असतात. या घटनेविरुध्द साधनाने अग्रलेख लिहून "सती, की भुतावळीचा बळी ?" [९] अत्यंत जहाल टिका केली आहे.साधना म्हणते सतीची घटना घृणास्पद खरीच,पण त्याहून घृणास्पद म्हणजे या घटनेच्या पावित्र्याचा उदोउदो करणारा चुनरी महोत्सव. हातात नंग्या तलवारी घेतलेले एकवीस राजपूत युवक रात्रंदिन पहारा करत होते. हे सर्व घडताना राजस्थानचे शासन काय करीत होते ? असा प्रश्न साधनाने विचारला.राजस्थानच्या मुख्यमंत्र्यांनी केवळ जाहिर निषेध केला परंतू त्यापलीकडे कोणतही कायदेशीर कारवाई केली नाही. त्यामुळे साधनाने मख्यमंत्र्यांवर कडक टिका करताना म्हटले राज्यकर्त्यांचे कर्तव्य त्यांनी मुळीच पार पाडले नाही. सतीची घटना त्यानंतर त्याठिकाणी मंडप बांधण्याचा तमाशा बघणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी राजीनामाच दिला पाहिजे. असे म्हणून राजस्थानच्या शासनाचा तीव्र धिक्कार केला

रुपकुंवर घटनेनंतर श्रृती तांबे यांनी देवरालाचा दौरा करुन परिस्थितीचे अवलोकन केल. सती प्रथेचा वेध घेताना सती गेलेल्या रुपकुंवरचे नाव काढताच भक्तीने हात जोडणारी मंडळी, या प्रकरणातील व्यर्थता पटलेले पण अनेक कारणांनी गप्प बसणारे भ्याड सुशिक्षित, सती म्हणजे देवी-जिला अडवणार कोण, कसे ? असे म्हणणारे शहाजोग, "सती होणार –आडकाठी आणणाऱ्या सरकारला इंगा दाखवू" म्हणणारी धर्मरक्षा समिती, माझी मुलगी सती गेली तर ती धन्य होईल असे म्हणणाऱ्या माता अशा विविध प्रतिक्रिया श्रृती तांबे यांनी साधनेच्या वाचकांना सविस्तर सांगितल्या. महाराष्ट्रात म. फुले, डॉ.आंबेडकर यांच्यासारख्या व्यक्तींमुळे महाराष्ट्रात समाजसुधारणा झाल्या पण भारतात इतरत्र राजस्थान सारखी राज्ये मात्र मागासलेली राहिली याचे उत्तम विवेचन "रुपकुंवर : ज्वाळांनी न जळालेला एक अश्रू" [१०]

या लेखात आपल्याला दिसते.रुपकुंवर घटनेनंतर महाराष्ट्रात ठिकठिकाणी स्त्रियांच्या संघटनांनी व इतर सामाजिक संस्थांनी निषेधाच्या सभा घेतल्या त्याचा सविस्तर वृत्तांत साधनाने आपल्या अंकात देऊन वाचकांच्या प्रतिक्रियाही देऊन साधनाने समाजमन पुन्हा एकदा ढवळून काढले.

आपल्या समाजात अंधश्रध्देचा जोर असा काही आहे की समाजसुधारक कितीही उदात्त विचार मांडो ते विचार समाजमन बदलणयास रसे यशस्वी होत नाही. आपल्याकडील नामसप्ताहांना, दिंडयांना, पालख्यांना आणि पूजा अर्चांना आता यंत्रवत स्वरुप प्राप्त झालेले आहे. ओम मणिपद्माच्या अखंड जपामुळे ज्याप्रमाणे तिबेटच्या नशिबातली गुलामगिरी चुकली नाही. त्याचप्रमाणे धर्मसिंधूतली हजारो व्रतवैकल्ये आमच्या समाजाचा अध:पात थांबवू शकलेली नाही. हे स्पष्ट दिसत असताना देखील ते वांझ कर्मकांड सोडण्याची हिंमत आमचा समाज करीत नाही याचा साधनालाखेद वाटतो.

## टीपा आणि संदर्भ ग्रंथ


१. डॉ. आ.ह. साळुंखे यांचे '*हिंदू संस्कृती आणि स्त्री*' पृ. ८३.
२. *साधना साप्ताहिक*, २६ मार्च १९७७ पृ.१४.
३. *साधना साप्ताहिक*, ३ ऑक्टोबर १९८१ पृ.१०.
४. *साधना साप्ताहिक*, १६ जुलै १९८३ पृ. १८.
५. *साधना साप्ताहिक*, २ एप्रिल १९८३ पृ.१९.
६. *साधना साप्ताहिक*, समता-संगर वर्धापन दिन विशेषांक १९८१ पृ. २५ .
७. *साधना साप्ताहिक*, गुरुवार.१५ ऑगस्ट १९८५ पृ.५६.
८. *साधना साप्ताहिक*, २५ मार्च १९७२ पृ.२.
९. *साधना साप्ताहिक*, गुरुवार ता. २४ सप्टेंबर १९८७ पृ. ३.
१०. *साधना साप्ताहिक*, ३ डिसेंबर १९८७ पृ. ७.
११. कोसंबी मीरा, *पंडिता रमाबाई*, गंधर्ववेद प्रकाशन, पुणे,२०१०.
१२. कीर धनंजय, *राजर्षी शाहू छत्रपती*, पॉप्युलर प्रकाशन , मुंबई, १९७९.
१३. केळकर काशिनाथ नरसिंह, खरे बाळुताई, *स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा*, रघुनाथ आणि कंपनीज प्रेस, पुणे, १९३०.
१४. खडपेकर विनया, *स्त्री मुकतीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा : स्त्री स्वातंत्र्यवादिनी: विसाव्या शत कातील परिवर्तन*, पॉप्युलर प्रकाशन , मुंबई, १९९१.